**स.के.नं. ७१२/२०२५**
**नि.क्र. ९/क च्या पुढे**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र.५** याची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | **योगेश प्रमोद गोळे** |
| वय | - | **३८ वर्षे** |
| व्यवसाय | - | **नोकरी** |
| राहणार | - | **पेण** |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती शितल पवार यांच्यामार्फत...**

१. पोलिसांनी माझेकडे ०७.०१.२०२५ रोजी मला फोनव्दारे बोलावुन माझेकडे चौकशी केली होती. मी घटनेच्या वेळी सिगल शिपींग सर्व्हीसेस, बेलापूर या कंपनीत मेंटनन्स मॅनेजर म्हणून नोकरीस होतो. त्यादिवशी मला सुपरवायझर धिरज यांचा आमचे गाडीचा अपघात झाल्याबाबत फोन आला होता. तो अपघात एम.ए.४३ सी .ई ८८४४ या वाहनाचा झाला होता. त्या वाहनावर धमेंद्र हा चालक होता. तो अपघात उरण येथे झाला होता. तो अपघात कसा झाला याची मला प्रत्यक्ष माहिती नाही. त्याबाबत मला पोलिसांनी सांगितले.

**साक्षीदार मुख्य मुद्यावर सहकार्य करत नसल्याचे सांगून सरकारी वकीलांनी त्याला सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. करिता परवानगी देण्यात येते.**

हे म्हणणे खरे आहे की, ते वाहन चालक धमेंद्र पाल हा जे.एन.पी.टी येथून लोखंडी कॉईल लोड करून निघाला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो ते वाहन पोस्को कंपनीत घेउन जात होता. हे मला माहित नाही की, तो ट्रेलर उरण येथील सोनारी गावाजवळ

आला असता एका रस्ता क्रॉस करणा-या व्यक्तीला धडकला. त्या व्यक्तीचे नाव अकलेश्वर महोतो असल्याचे मला पोलिसांनी सांगितले होते. हे मला माहित नाही की, त्या वाहनाचा डाव्या बाजूचा टायर त्या व्यक्तीच्या उजव्या पायावरून गेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी आमचे कंपनीतील अमित ठाकूर यांना घटनास्थळावरून जाउन काय झाले हे पाहण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, अमित ठाकूर याने त्या व्यक्तीस दवाखान्यात नेले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या अपघाताची माहिती मी कंपनीचे मालक लवीश बजाज यांना फोनवर दिली होती. आता मला माझे जबाबातील अधोरेखांकित भाग अ मधील मजकूर वाचून दाखवला तो बरोबर नाही. पोलिसांनी माझे जबाबात तसा मजकूर का नमूद केला याचे कारण सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तसा मजकूर सांगितल्याने पोलिसांनी माझे जबाबात तो मजकूर लिहला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्याने त्याला वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. जितेंद्र कातर्णे यांचेव्दारा ...**

२ हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना कोणाच्या चुकीने झाली याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबतील मजकूर पोलिसांनी आधीच लिहून ठेवला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या जबाबात काय मजकूर नमूद आहे हे मला माहिती नाही.

**उलटतपास नाही .**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/-

**उरण,** **(एस. पी. वानखडे)**

**दिनांक – ०९.०१.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण**

**(न्यायालय क्र.२)**